

कोंढवा : प्रदर्शनात लावलेली छायाचित्रे पाहताना विद्यार्थी.

# 'विश्वकर्मा'मध्ये छायाचित्र प्रदर्शन

पुणे : कोंढव्यातील विश्वकर्मा विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या वतीने छायाचित्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. चार दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनाचे उद्‌घाटन बुधवारी (२९ नोव्हेंबर) झाले. 'शहरातील माणसे आणि इमारती' यावर आधारित प्रदर्शनाची संकल्पना आहे. वेगाने विस्तारणाऱ्या पुणे शहरातील जुन्या इमारती, महत्त्वाची स्थळे, काम करणारी माणसे यामध्ये कॅमेराबद्ध करण्यात आली आहेत. शनिवारपर्यंत (ता. २) हे प्रदर्शन नागरिकांसाठी खुले असेल. प्रदर्शनाविषयी बोलताना विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रा. चेतन कापडणीस म्हणाले, की या सर्व छायाचित्रांमधून पुण्यातील सामान्य नागरिक आणि वास्तू यांचे एकमेकांशी असलेले नाते प्रकर्षाने जाणवते.